**ठळक बातम्या**

- रिझर्व्ह बँकेकडून व्याजदरात पाव टक्क्यांची कपात, चालू आर्थिक वर्षाचा आर्थिक वृद्धी दराचा अंदाज घटवला, महागाई कमी राहण्याचीही आशा

- बिहारमध्ये वीज कोसळून झालेल्या दुर्घटनेत १३ जणांचा मृत्यू

- डोमिनिक रिपब्लिकमध्ये नाईट क्लबचं छत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ११३ जणांचा मृत्यू, १५० हून अधिक लोक जखमी

**आणि**

- अमेरिकेनं लादलेल्या अतिरीक्त आयात शुल्काच्या परिणामांची चाचपणी सुरू असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचं प्रतिपादन, चीननं अमेरिकेवर लादले आणखी कर

<><><><><>

रिझर्व्ह बँकेचं चालू आर्थिक वर्षाचं पहिलं पतधोरण आज जाहीर झालं. बँकेच्या पतधोरण आढावा समितीनं रेपो दरात पाव टक्के कपात करून तो ६ टक्क्यांवर आणला आहे. पतधोरण आढावा समितीनं चालू आर्थिक वर्षात आर्थिक वृद्धी दराचा अंदाज सहा पूर्णांक ७ दशांश टक्क्यांवरून साडेसहा टक्क्यांपर्यंत खाली आणल्याची माहितीही रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली आहे. गेल्या बैठकीत हा दर ६ पूर्णांक ७ दशांश टक्के राहील, असा अंदाज पतधोरण आढावा समितीनं वर्तवला होता. त्याचवेळी गेल्या आर्थिक वर्षासाठीचा आर्थिक वृद्धी दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांवरुन वाढवून साडे ६ टक्के होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. या आर्थिक वर्षात देशाचा किरकोळ महागाई दर ४ टक्के राहण्याचा अंदाज असल्याचंही मल्होत्रा यांनी सांगितलं. यापूर्वी हा दर ४ पूर्णांक ८ टक्के राहण्याचा अंदाज रिझर्व्ह बँकेनं व्यक्त केला होता. याव्यतिरिक्त, सोने तारण कर्जाच्या संपूर्ण प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी सर्वसमावेशक नियमावली प्रसिद्ध

करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. तसंच यूपीआय द्वारे होणाऱ्या व्यवहारांची मर्यादा वाढवण्याचा रिझर्व्ह बँकेचा विचार असल्याचं सूतोवाचही त्यांनी केलं.

<><><><><>

रिझर्व्ह बँकेनं केलेल्या व्याजदर कपातीचं बँकांनी स्वागत केलं आहे. यामुळं गृह, वाहन आणि व्यक्तिगत कर्जांची मागणी वाढेल. मध्यम आणि छोट्या आकारांच्या शहरांमध्ये प्रामुख्यानं या मागणीत वाढ होईल, अशी प्रतिक्रिया इंडियन बँकेचे व्यवस्थापकीय संचालक बिनोद कुमार यांनी दिली आहे. तात्काळ व्याजदर कपातीची तयारीही त्यांनी दर्शवली आहे. जागतिक पातळीवर असलेल्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर ही व्याजदर कपात आणि इतर निर्णय दिलासादायक आहेत. अमेरिकेनं वाढवलेल्या आयात करांचा परिणाम थोडा कमी व्हायला यामुळं मदत होईल, अशी प्रतिक्रिया स्टेट बँकेचे अध्यक्ष सी. एस. शेट्टी यांनी दिली आहे. HDFC बँकेच्या मुख्य अर्थतज्ज्ञ साक्षी गुप्ता यांनी चालू आर्थिक वर्षात आणखी दोनवेळा व्याजदर कपातीची अपेक्षा व्यक्त केली आहे.

<><><><><>

कमांड क्षेत्र विकास आणि जलव्यवस्थापन आधुनिकीकरणाची कामं प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत करण्याला आज केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. याकरता सोळाशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर ही माहिती दिली. यामुळे शेतकऱ्यांना जास्त पीक मिळवण्यासाठी मदत होईल. या अंतर्गत सुरू होणाऱ्या ७८ प्रकल्पांमध्ये ८० हजार शेतकऱ्यांचा समावेश केला जाईल, असंही वैष्णव म्हणाले.

आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूमधल्या तिरुपती-पकला-कटपाडी रेल्वे मार्गाच्या दुपदरीकरणाला सरकारने मंजुरी दिली आहे. तसंच, सरकारने १ हजार ८७८ कोटी

रुपयांहून अधिक खर्चाच्या सहा पदरी झिरकपूर बायपास निर्मितीलाही मान्यता दिली आहे.

<><><><><>

योजना आखताना ग्रामीण भारताचा विकास नजरेसमोर ठेवायला हवा, त्यामुळे देशांतर्गत स्थलांतरं रोखता येतील असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भरलेल्या किसान कुंभ कार्यक्रमात ते बोलत होते. सरकारी योजनांमुळे शेतकरी तसंच समाजातल्या कमकुवत वर्गाला फायदा व्हायला हवा, यामुळे राष्ट्रीय उत्पन्नामधलं त्यांचं योगदान वाढेल आणि शहराकडे स्थलांतर होण्याला आळा बसेल, असं ते म्हणाले.

<><><><><>

हवामान बदल हे आजचे सर्वात मोठं संकट असून जैन समुदायानं शतकानुशतके पाळलेली शाश्वत जीवनशैली हाच त्याचा उपाय असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं नवकार महामंत्र दिवसानिमित्त एका सभेला संबोधित करत होते. नवकार महामंत्र हा जैन धर्मातल्या अहिंसा, नम्रता आणि आध्यात्मिक उन्नतीच्या तत्वांचा मंत्र आहे. साधेपणा, संयम आणि शाश्वतता ही जैन समाजाच्या जीवनाचं मूळ असल्याचं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

<><><><><>

पोषणाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी महिला आणि बालविकास मंत्रालय पोषण पंधरवडा साजरा करत असून हा उपक्रम मिशन पोषण २.०चा एक भाग आहे. नवजात अर्भकांच्या पहिल्या हजार दिवसांवर लक्ष केंद्रित करणं, गर्भधारणेपासून ते दोन वर्षांपर्यंतच्या पोषणाचं महत्त्व अधोरेखित करणं तसंच बालवयातलं पोषण यावर या उपक्रमाचा भर आहे.

<><><><><>

सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया अर्थात सेबीचे सदस्य, तसंच अधिकाऱ्यांची मालमत्ता, गुंतवणूक, दायित्व इत्यादींबाबतचे हितसंबंध आणि याबद्दलची माहिती सार्वजनिक करण्यासंदर्भातल्या तरतुदींचा व्यापक आढावा घेऊन शिफारशी करण्यासाठी सहा सदस्यांची समिती स्थापन केली आहे. माजी मुख्य दक्षता आयुक्त प्रत्युष सिन्हा या समितीच्या अध्यक्षपदी, तर आंतरराष्ट्रीय वित्त सेवा प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष इंजेटी श्रीनिवास उपाध्यक्षपदी असतील. ही समिती संबंधित तीन महिन्यांच्या आत आपल्या शिफारशी सेबीला सादर करेल.

**<><><><><>**

बिहार मध्ये वीज कोसळल्याच्या घटनेत मृत पावलेल्यांची संख्या १३ वर जाऊन पोहोचली आहे. यातील ५ जण बेगुसराई जिल्ह्यातले असून ३ जण मधुबनी जिल्ह्यातले आहेत तर दरभंगा इथले २ आणि समस्तीपूर इथला एकजण या दुर्घटनेत दगावला. बिहार राज्यात अन्यत्र देखील पाऊस सुरु असून त्यात ५ जण मृत्युमुखी पडले तर ४ जण जखमी झाले. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मृतांच्या कुटुंबियांना ४ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

डोमिनिक रिपब्लिक या देशाच्या राजधानीत ,सॅन्टो डोमिंगो इथे एका नाईट क्लबचं छत कोसळून झालेल्या अपघातात सुमारे ११३ लोक ठार झाले तर १५० हुन अधिक जण जखमी झाले. लोकप्रिय गायक रुबी पेरेझ याच्या गाण्याची मैफल रंगात आली असताना हा प्रकार घडला. मृतांमध्ये रूबीचा देखील समावेश आहे. माजी खेळाडू आणि तिथल्या परगण्याचे राज्यपाल ऑक्टव्हिया डोटेल यांनाही या अपघातात प्राण गमवावे लागले. अजूनही शोधकार्य सुरु असून मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**<><><><><>**

चीनमधल्या हेबेई शहरातल्या एका रुग्णालयाला लागलेल्या आगीत २० जणाचा मृत्यू झाला आहे. या रुग्णालयात दाखल असलेल्या इतर १९ जणांना जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आल्याचं स्थानिक प्रसार माध्यमांनी म्हटलं आहे. मृतांमध्ये वृद्ध, महिला आणि मुलांचाही समावेश आहे.

**<><><><><>**

अमेरिकेने लादलेल्या अतिरीक्त आयात शुल्काचे काय परिणाम होतील याची पडताळणी भारत करत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. भारत आणि अमेरिका परस्परांच्या हिताचा द्विपक्षीय व्यापार करार करण्याविषयी प्रयत्न करत आहेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. भारतासाठी अमेरिकेसोबतची जागतिक धोरणात्मक भागीदारी महत्वाची असून त्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

अमेरिकेवरुन आयात होणाऱ्या वस्तूंवर अतिरीक्त ८४ टक्के शुल्क लादण्याचा निर्णय चीननं घेतला आहे. उद्या मध्यरात्रीपासून याची अंमलबजावणी होईल, असं चीनच्या अर्थमंत्रालयानं जाहीर केलं आहे. अमेरिकेनं चीनी उत्पादनांवर १०४ टक्के आयात शुल्क लादल्यानंतर चीननं हा निर्णय घेतला आहे. अमेरिकन जागतिक व्यापार व्यवस्थेला गंभीर हानी पोहोचवली आहे, यामुळे जागतिक औद्योगिक पुरवठा साखळी, स्थैर्य आणि सुरक्षा धोक्यात आल्याचं चीननं प्रसिद्ध केलेल्या श्वेत पत्रिकेत म्हटलं आहे. हा मुद्दा सोडवण्यासाठी अमेरिकेसोबत चर्चेची तयारीही चीननं दाखवली आहे. दक्षिण कोरियाचे वाणिज्य मंत्री चेंओंग इन क्यो आयात शुल्क प्रकरणी वाटाघाटी करण्यासाठी अमेरिका दौऱ्यावर आहेत. त्यांच्या देशावर २५ टक्के आयात शुल्क लादलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प

यांनी लादलेल्या आयात शुल्कांमुळे जागतिक पातळीवर वृद्धी आणि वित्तीय स्थिरता धोक्यात आल्याचे बँक ऑफ इंग्लंडनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातला आरोपी तहव्वुर राणा याला भारतात आणलं जात असल्याचं वृत्त आहे. तो अमेरिकेतल्या तुरुंगात होता. भारतीय अधिकाऱ्यांनी त्याची कोठडी घेतली असून ते भारताकडे निघाले आहेत. काही महिन्यांपूर्वी राणा याच्या प्रत्यार्पणाला मंजुरी मिळाली होती. या निर्णयाला आव्हान देणारी त्याची याचिका अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं काही काळापूर्वी फेटाळली होती.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज गुजरात टायटन्सचा सामना राजस्थान रॉयल्सबरोबर अमदाबादमध्ये सुरू आहे. राजस्थाननं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा गुजरातच्या आठ षटकात १ बाद ८१ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**